**नि क्र सीडब्ल्यू.१ ( सी.१२ ) श्रीमती.मालन दगडू बनसोडे**

शपथेवर कथन करतो की;

माझे नाव **श्रीमती.मालन दगडू बनसोडे.** वय.५० वर्षे राहणार – सिध्देश्वर नगर; मजरेवाडी; सोलापूर.

मी याकामी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र.सीडब्ल्यू.१ ( सी.१२ )** खाली दाखल केले असून ते मी वाचले आहे त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. प्रतिज्ञापत्रावर माझी सही आहे. मला प्रतिज्ञापत्रा व्यतिरिक्त अन्य काही सांगायचे नाही.

**<u>उलटतपासणी तक्रारदारातर्फे श्री.व्ही.आर.देशपांडे, विधिज्ञ यांचेमार्फत,</u>**

**१६.** हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार श्री राजेंद्र शिंदे हे सन १९९९ मध्ये चालक सेवेत म्हणून रुजू झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना दि.१५.०२.२०१७ रोजी वैद्यकीय दृष्टया अपात्र ठरवून सेवेतून कमी केले. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदारांना कामावरुन कमी केल्यानंतर त्यांनी अर्ज करुन पर्यायी पदावर काम देण्याची वारंवारपणे मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यानुसार दि.११.०५.२०१८ रोजी तक्रारदार यांना शिपाई पदावर रुजू करुन घेण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदारांना दि.१५.०२.२०१७ ते दि.१०.०५.२०१८ या कालावधीचा पगार दिलेला नव्हता.

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाले यांचे मध्यवर्ती कार्यालयाने परिपत्रक दि.१०.०९.१९७५ व दि.०७.१०.१९८१ अन्वये वैद्यकीय अपात्र कर्मचा-यांना सेवेत खंड न देता पगाराचे नुकसान न करता, पगार संरक्षित करुन पर्यायी पदावर कामावर घेणे. हे म्हणणे खरे आहे की, अपंग कर्मचा-यांना समान संधी करिता देणेबाबतचा कायदा सामनेवाले यांना लागू आहे. हे म्हणणे खरे आहे की, श्री शिवाजी दोरगे, श्री संग्राम उबाळे, श्री महादेव नाईकनवरे, श्री सुरेश वगरे या वैद्यकीय अपात्र झालेल्या कर्मचा-यांना मागील पगार दयावा व सेवा सलग धरावी असा या न्यायालयाचा आदेश झाला तो मा.उच्च न्यायालयामध्ये कायम करण्यात आला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरील कर्मचा-यांना मा.उच्च न्यायालयाच्या

आदेशानुसार त्यांची सेवा सलग धरून पगार देण्यात आला व ग्रॅच्युईटी आणि निवृत्तीवेतन लाभ दिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरीलप्रमाणे फायदा तक्रारदार यांना देण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरील कृत्य हे सामनेवाले यांचे अनुचित कामगार प्रथा आहे. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदारांना सेवेतून कमी केल्यापासून ते पुन्हा कामावर घेईपर्यंत मधल्या काळातील पूर्ण पगार सलग सेवा व अनुषंगिक लाभ देण्याची जबाबदारी सामनेवाले यांची आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सामनेवाले महामंडळात अधिकारी पदावर कार्यरत असल्याने सामनेवाले बाजूने साक्ष देत असून ती खोटी व चुकीची आहे.

**उलटतपासणी पूर्ण.**

**फेरतपास काहीही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/-

(मु. रा. कुंभार)
सदस्य
औद्योगिक न्यायालय सोलापूर

सोलापूर.
दिनांक.०४.१२.२०२५
*माकम*